# कार्यकारी सारांश

**१.१. पार्श्वभूमी आणि याचिकेची व्याप्ती:**

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. (जे कि यापुढे महानिर्मिती किंवा याचिकाकर्ता या नावांनी संबोधले जाईल.) ही कंपनी महाराष्ट्र शासनाच्या सामान्य आदेश क्र.ई.एल.ए.-००३/ पी. के. ८५८८/भाग-२/ऊर्जा-५ दिनांक: २४ जानेवारी,२००५ नुसार दिनांक-०६ जून,२००५ रोजी अस्तित्वात आली. या कंपनीचा कारभार विद्युत अधिनियम २००३ मध्ये असलेल्या तरतुदीनुसार कार्यरत आहे. महानिर्मिती भारतातील सर्वात मोठी स्थापित वीजनिर्मिती क्षमता असलेली कंपनी असून दि.३१ मार्च २०१८ रोजी एकूण कार्यान्वित क्षमता हि १३४२१ मे.वॅट. एवढी आहे.

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. सदर याचिकेद्वारे पुढील प्रकारचे मुद्दे माननिय आयोगासमोर मान्यते प्रित्यर्थ सादर करीत आहे.**

अ. आ.व.२०१७-१८ व आ.व.२०१८-१९ या वर्षासाठीचे लेखांकित लेखापुस्तीके प्रमाणे आणि वीजदर विनियम २०१५ नुसार अंतिम समायोजन.

ब. आ.व.२०१९-२० (एप्रिल ते सप्टेंबर) या कालावधीसाठी अर्धवार्षिक वास्तव कामगिरीवर आधारित व पुढील अर्धवर्षासाठी (ऑक्टोबर ते मार्च) अंदाजित कामगिरीचे वीजदर विनियम २०१५ नुसार समायोजन.

क. आ.व.२०२०-२१ ते आ.व.२०२४-२५ या वर्षासाठी मा.वीज नियामक आयोगाने (बहुवार्षिक वीजदर) विनियम २०१९ मधील मार्गदर्शक तत्वानुसार व याचिकेत विस्ताराने नमूद केलेल्या गृहीतकानुसार एकूण अंदाजित महसुलाची आवश्यकता व बहुवार्षिक वीजदर निश्चिती.

**१.२ आ.व.२०१७-१८ व २०१८-१९ चे अंतिम समायोजन व २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी तात्पुरते समायोजन.**

**संचलन कामगिरी (Operational Performance):**

महानिर्मितीने त्यांच्या प्रत्येक विजनिर्मिती केंद्रांसाठी माननिय वीज नियामक आयोगाने निर्देशित केलेल्या मानकानुसार व प्रत्यक्षात झालेल्या कामगीरीचा तुलनात्मक अहवाल सादर केला आहे. महावितरण कंपनीकडून विजेची कमी मागणी व कोळसा व गॅस यांच्या अल्प उपलब्धतेमुळे प्रत्यक्ष संयंत्र उपलब्धता व संयंत्र भारांक व मा.विज नियामक आयोगाने निर्देशित केलेल्या मानकांत तफावत आहे. तसेच, कोराडी संच क्र.६ हे नूतनीकरण आणि आधुनिकीकरण व आयुर्मान वाढविणे या कामासाठी जानेवारी २०१९ पर्यंत बंद होते. चंद्रपूर व परळी विजकेंद्रांना आ.व.२०१७-१८ मध्ये अत्यंत अपुऱ्या पाणी उपलब्धतेचा सामना करावा लागला व त्यामुळे वीज उत्पादन हे आयोगाने मान्यता /निर्देशित केलेल्या उत्पादनापेक्षा कमी राहिले.

**इंधन आकार (Energy Charges):** इंधन आकाराच्या समायोजनासाठी महानिर्मितीने आ.व.२०१७-१८ व आ.व.२०१८-१९ या वर्षासाठी प्रत्यक्ष वीजनिर्मिती, प्रत्यक्ष वापरलेल्या इंधनाची (कोळसा व तेल) किंमत ,

उष्मांक व वीज नियामक आयोगाने निर्धारित केलेल्या मानकांचा उपयोग केला आहे. आ.व.२०१९-२० या कालावधीसाठी माहे एप्रिल ते सप्टेंबर यामध्ये प्रत्यक्षात झालेली कामगिरी हि मा. आयोगाच्या मान्यतेसाठी सादर केली असून, त्याच बरोबर पुढील अर्धवर्षासाठी (ऑक्टोबर ते मार्च) अंदाजित कामगिरी सुद्धा सादर केली आहे.

**स्थिर आकार (Fixed Charges)** : स्थिर आकाराचा दर निश्चित करण्यासाठी महानिर्मिती कंपनीने आ.व.२०१७-१८ व आ.व.२०१८-१९ या वर्षासाठी प्रत्यक्ष भांडवली खर्चात रुपांतरीत होणाऱ्या भांडवली खर्चाचा पूर्ण तपशील सादर केला आहे. स्थिर आकार दर निश्चिती खालील घटकांआधारे केली आहे.

अ. **संचालन व दुरुस्ती विषयक खर्च (O&M Expenses)** : संचालन व दुरुस्ती यासाठीचा प्रत्यक्षात झालेला खर्च हा मा.आयोगाने निश्चित केलेल्या मानकानुसार विचारात घेतला आहे. पाणी वापराचा खर्च हा दुरुस्ती देखभाली खर्चाच्या व्यतिरिक्त घेण्यात आला आहे. मुख्य कार्यालयाचा खर्च हा सर्व विजकेंद्रावरती विभागण्यात आला आहे. पंचवार्षिक पगार वाढ विचारात घेण्यात आली आहे.

आ. **घसारा (Depreciation) :** आ.व.२०१६-१७ वर्ष अखेरीस लेखा पुस्तीकेनुसार व भागभांडवलामध्ये रुपांतरीत झालेल्या योजना नुसार घसारा निधी आकारण्यात आला आहे.

इ. **कर्जावरील व्याज (Interest on Loans)** : आ.व.२०१६-१७ च्या अखेरीस लेखांकित लेखा पुस्तिकेनुसार व विविध वित्त संस्थांच्या व्याज दरानुसार .

ई. **खेळत्या भांडवलावरील व्याज (Interest on Working Capital)** : मा. विज नियामक आयोगाच्या विनियम २०१९ च्या निर्देशित केलेल्या मानक व व्याजदर निश्चिती तत्वानुसार .

उ. **भाग भांडवलावरील परतावा (ROE)** : मा. विज नियामक आयोगाने दिलेल्या पूर्वीच्या/मागील आदेशानुसार.(आ.व.२०१७-१८ साठी ७.५%, व १५.५% तदनंतरच्या वर्षासाठी).

ऊ. **आयकर (TAX)** : आ.व.२०१७-१८ व आ.व.२०१८-१९ या वर्षासाठी प्रत्यक्षात भरणा केलेला कर व आ.व. २०१९-२० या वर्षासाठी भविष्यातील अंदाजित उत्पन्नावर.

ऋ. **वीज विक्री सोडून उत्पन्न (NTI)** : लेखांकित लेखा पुस्तिकेप्रमाणे परंतु याचिकेत दाखवल्याप्रमाणे काही बाबतीत वजावट सुचविण्यात आली आहे.

ऌ. विज उत्पादनासाठी राखीव ठेवलेल्या संचांचे खर्च हे वेगळ्या प्रकारे दाखविलेले आहे.

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीने मा.वीज नियामक आयोगास गुणवत्ता व मर्यादावर आधारित मानकासाठी जरी काही प्रमाणात सूट देण्याची विनंती केलेली असली तरीही महानिर्मिती कंपनीने आयोगाने निश्चित केलेल्या मानकानुसार उपलब्धतेवर आधारित उत्पन्नातील घट व अपुऱ्या इंधनाचा होणारा विजनिर्मितीवरील परिणाम विचारात घेतला आहे. व यासर्व बाबी महानिर्मितीने वीज अपील न्यायाधिकरण (ATE) / व सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेच्या अधीन राहून केलेले आहे. तसेच वरील घटनात्मक संस्थांनी दिलेल्या निर्णयाचे पुढील याचिकेमध्ये अनुसरण केले जाईल.

वरील सर्व बाबी व्यतिरिक्त महानिर्मितीने खालील गोष्टीमुळे होणारा परिणाम विचारात घेतलेला आहे.

अ. प्रतिक्रियाशील ऊर्जा शुल्काची आकारणी. (Reactive Energy)

आ. आ.व.२०१५-१६ या वर्षासाठी मा. आयोगाने मान्य केलेले दुरुस्ती व देखभाल यामध्ये परकीय चलनाच्या विनिमय दरातील विपरीत बदलामुळे झालेली तुट (रुपये ९४.०९ कोटी) हि दोन वेळेस विचारात घेतली गेलेली आहे.

इ. आ.व.२०१६-१७ यामध्ये संशयास्पद अग्रीमाचे (रु.३७.९७ कोटी) दोन वेळेस झालेली वजावट.

ई. आ.व.२०१७-१८ व आ.व.२०१८-१९ या वर्षासाठी प्रकरण क्र.१७२ वर्ष २०१७ मध्ये केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेसाठीचे सामान्य प्रशासकीय खर्च व सर्वसाधारण खर्च याचे समायोजन.

उ. खापरखेडा संच क्र.५ साठीची निर्धारित नुकसान (LD) याचे निश्चितीकरण.

ऊ. आ.व.२०१९-२० मध्ये जलविद्युत केंद्रामध्ये अतिवृष्टीमुळे आकस्मिकरित्या पाणी भरल्यामुळे संच पुन: स्थापित करण्यासाठीचा झालेला खर्च.

ऋ. आ.व.२०१७-१८ व आ.व.२०१८-१९ या वर्षासाठी पारस संच क्र.३-४ व परळी संच क्र.६,७ या संचांसाठी 'ट्यूब' प्रकारच्या कोल मिल यांच्या उपयोगामुळे सहाय्यकारी वीज वापरामध्ये सुट मिळावी.

ऌ. पंचवार्षिक पगार वाढीचा होणारा महसुलावरील परिणाम.

आ.व.२०१७-१८ व २०१८-१९ या वर्षासाठी एकत्रित अंतिम समायोजन व आ.व.२०१९-२० साठी तात्पुरते समायोजन आणि वहन / धारण किंमत (Carrying / Holding Cost) हि खालील तक्त्यामध्ये दर्शविली आहे.

**तक्ता क्र. १: आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी वास्तविक खर्च आणि अंतिम हक्क (रुपये कोटी)**

| तपशील | प्रमाणकाप्रमाणे | प्रत्यक्ष खर्च | कार्यक्षमता (नफा)/तोटा | सामायिक कार्यक्षमता (नफा)/तोटा | निव्वळ हक्क |
|---|---|---|---|---|---|
| | अ | ब | क = ब – अ | ड = १/३ (नफा)/तोटा | इ = अ + ड |
| **खर्च बाजू समायोजन** | | | | | |
| भाग भांडवलावरील परतावा | ७६७.४९ | | | | ७६७.४९ |
| कर्जावरील व्याज | २,१९०.९७ | | | | २,१९०.९७ |
| घसारा | १,८९७.३३ | | | | १,८९७.३३ |
| संचालन व सुव्यवस्था विषयक खर्च | २,४५४.०८ | २,८५१.८२ | ३९७.७४ | १३२.५८ | २,५८६.६६ |
| जल आकार | | १९४.०० | | | १९४.०० |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | ५१४.६७ | ५९८.४३ | ८३.७६ | २७.९२ | ५४२.५९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| वजा: वीज विक्री व्यतिरिक्त उत्पन्न | | ८४.४९ | | | ८४.४९ |
| अधिक: वस्तू आणि सेवा कर दावा | | | | | १९.४५ |
| वार्षिक स्थिर आकार | | | | | ८,११४.०१ |
| आयकर | | ५०.७८ | | | ५०.७८ |
| निष्क्रिय क्षमता शुल्क | ३५.६३ | | | | ३५.६३ |
| वेतन पुनर्रचनेचा परिणाम | | | | | - |
| जल भाडेपट्टी आकार | | ५१४.५० | | | ५१४.५० |
| **वीज आकार** | ११,२५८.२८ | ११,३६८.२५ | १०९.५१ | ३६.५० | ११,२९५.२५ |
| **एकूण महसुलाची आवश्यकता** | | | | | **२०,०१०.२३** |
| कमी उपलब्धतेमुळे वार्षिक स्थिर आकारातील घट | | | | | १,७७२.२२ |
| **निव्वळ महसुलाची आवश्यकता** | | | | | **१८,२३८.०१** |
| वीज विक्रीतून मिळणारा महसूल | | १८,३११.१७ | | | १८,३११.१७ |
| सयंत्राच्या अतिरिक्त सहाय्यकारी वीज वापरामुळे होणारी महसुलातील घट | | | ५९.२९ | १९.७६ | १९.७६ |
| **समायोजित महसूल** | | | | | **१८३३०.९३** |
| **महसुलाची तफावत (अधिशेष)** | | | | | **(९२.९२)** |

**तक्ता क्र. २: आ.व.२०१८-१९ साठी प्रत्यक्ष खर्च व अंतिम हक्क (रुपये कोटी)**

| तपशील | प्रमाणकाप्रमाणे | प्रत्यक्ष खर्च | कार्यक्षमता (नफा)/तोटा | सामायिक कार्यक्षमता (नफा)/तोटा | निव्वळ हक्क |
|---|---|---|---|---|---|
| | **अ** | **ब** | **क = ब – अ** | **ड = १/३ (नफा)/तोटा** | **इ = अ + ड** |
| **खर्च बाजू समायोजन** | | | | | |
| भाग भांडवलावरील परतावा | १,६२५.३९ | | | | १,६२५.३९ |
| दीर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज | २,०१२.०९ | | | | २,०१२.०९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| घसारा | १९५१.६५ | | | | १९५१.६५ |
| संचालन व सुव्यवस्था खर्च | २५६६.३२ | २,७७७.८६ | २११.५४ | ७०.५१ | २६,३६.८३ |
| जल आकार | | १८३.२८ | | | १८३.२८ |
| इतर खर्च | | ३४५.९८ | | | ३४५.९८ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | ५३६.७४ | ६३७.८१ | १०१.०७ | ३३.६९ | ५७०.४३ |
| वजा वीज विक्री सोडून उत्पन्न | | ९९.१३ | | | ९९.१३ |
| अधिक: वस्तू आणि सेवा कर दावा | | | | | २५.८६ |
| वार्षिक स्थिर आकार | | | | | ९,२५२.४८ |
| आयकर | | - | | | - |
| निष्क्रिय क्षमता शुल्क | ३३.६४ | | | | ३३.६४ |
| वेतन पुनर्रचनेचा परिणाम | | | | | - |
| जल भाडेपट्टी आकार | | ६१६.९३ | | | ६१६.९३ |
| **वीज आकार** | ११,९६९.४३ | १२,१०८.८५ | १३९.४२ | ४६.४७ | १२,०१५.९१ |
| **एकूण महसुलाची आवश्यकता** | | | | | २१,९१८.९६ |
| कमी उपलब्धतेमुळे वार्षिक स्थिर आकारातील घट | | | | | २,०३९.५२ |
| **निव्वळ महसुलाची आवश्यकता** | | | | | १९,८७९.४४ |
| वीज विक्रीतून मिळणारा महसूल | | १९,५९६.४७ | | | १९,५९६.४७ |
| सयंत्राच्या अतिरिक्त सहाय्यकारी वीज वापरामुळे होणारी महसुलातील घट | | | ८५.७८ | २८.५९ | २८.५९ |
| **समायोजित महसूल** | | | | | १९६२५.०६ |
| **महसुली तफावत (अधिशेष)** | | | | | **२५४.३८** |
| **तात्पुरत्या समायोजनातील मान्य असलेली महसुलाची तफावत / (अधिशेष)** | | | | | **(४३७.९५)** |
| **निव्वळ महसुलाची तफावत/ (अधिशेष) अंतिम समायोजनाच्या मान्यतेकरीता** | | | | | **६९२.३३** |

**समायोजनामध्ये समाविष्ट करण्यात आलेले इतर घटक**

**तक्ता क्र. ३: याचिकेत ज्या इतर बाबींवर समायोजन प्रस्तावित केले गेले आहे त्याचा सारांश खालील प्रमाणे आहे.**

| **इतर समाविष्ट** | **आर्थिक वर्ष २०१७-१८** | **आर्थिक वर्ष २०१८-१९** |
|---|---|---|
| खापरखेडा संच क्र.५ करिता निर्धारित नुकसान (LD) याचे निश्चितीकरण. | ४०.८२ | |
| दुरुस्ती व देखभाल यामध्ये परकीय चलनाच्या विनिमय दरातील विपरीत बदलामुळे झालेली तुट हि दोन वेळेस विचारात घेतली गेलेली आहे. | ३७.०८ | |
| संशयास्पद अग्रीमाचे दोन वेळेस झालेली वजावट | १३.३४ | |
| प्रतिक्रियात्मक ऊर्जा भरपाई (Reactive Energy) | १३८.३४ | |
| मुख्य मंत्री सौर कृषी वाहिनी योजनेसाठीचे मानव संसाधन व सर्वसाधारण खर्च यासाठीचे समायोजन. | १.२४ | १.९८ |
| **इतर एकूण** | **२३०.८२** | **१.९८** |

**समायोजन रकमेवरील वहन / धारण खर्च** (**Carrying** / Holding **cost on the true-up amount**):

**तक्ता क्र. ४: महानिर्मिती ने अंतिम समायोजन रकमेवरील वहन धारण खर्च काढण्यासाठी चा सारांश खालील प्रमाणे आहे.**

| **आर्थिक वर्ष** | **तपशील** | **वहन / धारण खर्च** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **वर्ष** | **आ.व.- २०१७-१८** | **आ.व.- २०१८-१९** | **आ.व.- २०१९-२०२०** | **आ.व.- २०२०-२१*** | **एकूण वहन/धारण किंमतीसह** |
| | | **रुपये कोटी** | **१०.१८%** | **९.८९%** | **९.८९%** | **९.८९%** | |
| आ.व. २०१८ | आ.व. २०१८ करिता अंतिम समायोजन | (९२.९२) | (४.७३) | (९.६६) | (१०.६१) | (५.८३) | (१२३.७५) |
| | इतर अतिरिक्त समायोजन | २३०.८२ | २३.५० | २५.१५ | २७.६४ | १५.१९ | ३२२.३० |
| आ.व. २०१९ | आ.व. २०१९ करिता अंतिम समायोजन | ६९२.३३ | | ३३.२४ | ७१.८६ | ३९.४८ | ८३७.९० |
| | इतर अतिरिक्त समायोजन | १.९८ | | ०.१० | ०.२१ | ०.११ | २.४० |

| एकूण | ८३२.२१ | | एकूण | १०३८.८४ |
|---|---|---|---|---|

*अर्धवार्षिक वहन/ धारण खर्च सप्टेंबर २०२० पर्यंत गृहीत त धरण्यात आलेला आहे

**आ.व.२०१९-२० साठी तात्पुरते समायोजन.**

**तक्ता ५ :आर्थिक वर्ष २०१९-२० साठी एकूण महसूल आवश्यकतेचा सारांश खालील तक्त्यात दिला आहे.**

**(रुपये कोटी)**

| **तपशील** | **प्रमाणकाप्रमाणे** | **प्रत्यक्ष** | **एकूण** |
|---|---|---|---|
| | **अ** | **ब** | **क** |
| **खर्च बाजू समायोजन** | | | |
| भाग भांडवलावरील परतावा | १,६७९.२५ | | १,६७९.२५ |
| कर्जावरील व्याज | १,८९७.७२ | | १,८९७.७२ |
| घसारा | २,०१६.०८ | | २,०१६.०८ |
| संचालन व सुव्यवस्था विषयक खर्च | २,६८३.५२ | | २,६८३.५२ |
| जल आकार | | १७८.३३ | १७८.३३ |
| इतर आकार | | ३६०.७५ | ३६०.७५ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | ६८०.५७ | | ६८०.५७ |
| वजा वीज विक्री सोडून उत्पन्न | | ९९.१३ | ९९.१३ |
| अधिक: वस्तू आणि सेवा कर दावा | | | ३१.२६ |
| वार्षिक स्थिर आकार | | | ९,४२८.३४ |
| आयकर | | - | - |
| निष्क्रिय क्षमता आकार | ३१.०२ | | ३१.०२ |
| वेतन पुनर्रचनेचा परिणाम | | ४८७.१६ | ४८७.१६ |
| जल भाडेपट्टी | | ५८०.७१ | ५८०.७१ |
| वीज आकार | १६,७८५.९१ | | १६,७८५.९१ |
| एकूण महसुलाची आवश्यकता | | | २७,३१३.१४ |
| वार्षिक स्थिर आकारातील घट $ | | | ११,५९.५६ |
| निव्वळ महसुलाची आवशकता | | | २६,१५३.५९ |

| | | | |
|---|---|---|---|
| वीज विक्रीतून मिळणारा महसूल | | २५,८०७.५८ | २५,८०७.५८ |
| **महसुली तफावत** (**अधिशेष**) | | | **३४६.०१** |

$ स्थिर आकाराची घट ही निर्देशित केलेल्या आणि भविष्यातील संचाची उपलब्धता प्रक्षेपित केल्यानुसार.

अंदाजित महसुलाची आकारणी हि अर्ध वार्षिक प्रत्यक्ष वीज निर्मितीवर व पुढील सहामहीच्यासाठी अंदाजित केलेल्या वीजनिर्मितीवर आधारित आहे. स्थिर आकारासाठी एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीसाठी प्रत्यक्षात असलेली उपलब्धता व ऑक्टोबर ते मार्च या कालावधीसाठी निर्देशित केलेल्या मानकानुसार उपलब्धता विचारात घेतलेली आहे.

**१.३ आ.व.२०२०-२१ ते आ.व.२०२४-२५ साठी बहुवार्षिक वीजदर निश्चिती.**

**बहुवार्षिक वीजदर निश्चिती करतांना खालील बाबींचा विचार करावा.**

अ. कोळशाचा सर्वसाधारण उष्मांक (GCV) काढतांना कोळशात असलेल्या बाष्पकामुळे होणारा परिणाम हा CERC व इतर राज्य विद्युत नियामक आयोग यांच्या शिथिल मानकानुसार गृहीत धरण्यात यावा.

ब. नवीनत: पूर्णत्वास गेलेल्या संचांसाठी शिल्लक राहिलेले काम पूर्ण करण्यासाठी व त्यांचे भाग भांडवलामध्ये समावेश करण्यासाठीचा वेळ वाढून मिळावा.

क. FGD या संयंत्राची स्थापना करण्यासाठी लागणाऱ्या भांडवली गुंतवणुकीस मान्यता मिळावी.

**इंधन वापराचा आराखडा (Fuel Utilisation Plan)**:

महाराष्ट्र वीज नियामक आयोग (बहुवार्षिक वीजदर) विनियम - २०१९ च्या कलम ४० च्या तरतुदीनुसार महानिर्मिती कंपनीने कोळसा पुरवठा संदर्भातील कराराची माहिती व कोळसा पुरवठा संदर्भातील नियोजन, Bridge linkages, गारेपालमा-२ खर्चाधारीत कोळसा तसेच आयात केलेला कोळसा (अंदाजे ३ दस लक्ष टन दर वर्षी) ही सर्व माहिती सादर केली आहे. तसेच वरील सर्व व्यवस्थेव्यतिरिक्त अंदाजे १७ MMT कोळसा धुतल्यानंतर गुणवत्ता सुधारण्याची योजना राबविणार आहे. त्यामुळे वीजनिर्मिती केंद्रांच्या कार्यक्षमते मध्ये सुधारणा होईल.

**संचलन कामगिरी आणि बहुवार्षिक वीजदर निश्चिती नियंत्रण कालावधी. (Operational Performance and MYT for the control period.)**

बहुवार्षिक वीजदर निश्चिती नियंत्रण कालावधी मध्ये कोळशाच्या उपलब्धतेमध्ये होणारी सुधारणा लक्षात घेऊन महानिर्मिती कंपनीने वीज निर्मिती केंद्राची कामगिरी हि आयोगाने निर्देशित केलेल्या मानकानुसार होणार हे गृहीत धरले आहे.

***बहुवार्षिक वीजदर निश्चिती नियंत्रण कालावधीमध्ये स्थिर आकार निश्चितीचे मुलभूत घटक खालील प्रमाणे आहे:***

अ. **संचालन व दुरुस्ती विषयक खर्च (O&M Expenses)**:
मागील तीन वर्षासाठी प्रत्यक्षात झालेला संचालन व दुरुस्ती विषयक खर्च हे विचारात घेतले असून त्यामध्ये ४.२७% वाढ गृहीत धरलेली आहे. पगार वाढीच्या संदर्भातील खर्च हा वेगळा गृहीत धरलेला आहे कारण तो मुळ खर्चात समाविष्ट केलेला नाही. संचालन व दुरुस्ती विषयक बद्दलचे तर्क / आधार हे याचिकेत सविस्तरपणे नमूद केलेले आहे.

आ. **घसारा (Depreciation)**: आ.व.२०१९-२० या वर्षासाठी लेखापुस्तीके प्रमाणे अंदाजित अंतिम ताळेबंद व प्रायोजित भाग भांडवलामध्ये रुपांतरीत केलेल्या खर्चावर.

इ. **कर्जावरील व्याज (Interest on Loan)**: आ.व.२०१९-२० वर्षासाठी सध्याचा एकत्रित कर्जाचा विविध वित्त संस्थाच्या विविध व्याजदरानुसार विचारात घेतले आहे.

ई. **खेळत्या भांडवलावरील व्याज (Interest on Working Capital)**: मा. विज नियामक आयोगाने विनियम २०१९ च्या निर्देशित केलेल्या मानका नुसार व मार्गदर्शक तत्वानुसार.

उ. **भाग भांडवलावरील परतावा (ROE)**: मा. विज नियामक आयोग विनियम २०१९ च्या निर्देशित केलेल्या मानका नुसार (१४ % परतावा हा किमान पर्यायी कर MAT दर विचारात घेऊन)

ऊ. **कर (TAX)**: भांडवलावरील परताव्याचे निश्चितीकरण करतांना किमान पर्यायी कर MAT दर गृहीत धरण्यात आला आहे.

ऋ. **वीज विक्री व्यतिरिक्त उत्पन्न (NTI)** : आ.व.२०१९-२० च्या प्रस्तावित वीज विक्री व्यतिरिक्त उत्पन्नाच्या अनुसार.

विद्यमान संचाच्या चौथ्या नियंत्रण कालावधीसाठी एकूण महसूल आवश्यकतेचा सारांश खालील तक्त्यांमध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता ६: सुधारित प्रक्षेपित केंद्रनिहाय अस्थिर आकार** (**रुपये युनिट**)

| **तपशील** | **आर्थिक वर्ष २०२०-२१** | **आर्थिक वर्ष २०२१-२२** | **आर्थिक वर्ष २०२२-२३** | **आर्थिक वर्ष २०२३-२४** | **आर्थिक वर्ष २०२४-२५** |
|---|---|---|---|---|---|
| भुसावळ संच क्र.३ | ४.०४ | ४.१७ | ४.२९ | ४.४२ | ४.५५ |
| चंद्रपूर संच क्र.३ ते ७ | २.८४ | २.९३ | ३.०२ | ३.११ | ३.२० |
| खापरखेडा संच क्र.१ ते ४ | २.९६ | ३.०४ | ३.१४ | ३.२३ | ३.३३ |
| कोराडी संच क्र.६, ७ | ३.०७ | ३.१७ | ३.२६ | ३.३६ | ३.४६ |
| नाशिक संच क्र.३ ते ५ | ३.३८ | ३.४८ | ३.५९ | ३.६९ | ३.८० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| उरण | २.५९ | २.६६ | २.७४ | २.८३ | २.९१ |
| पारस संच क्र.३ आणि संच क्र. ४ | ३.०२ | ३.११ | ३.२० | ३.३० | ३.४० |
| परळी संच क्र.६ आणि संच क्र. ७ | ३.८८ | ३.९९ | ४.११ | ४.२४ | ४.३६ |
| खापरखेडा संच क्र.५ | २.६३ | २.७१ | २.७९ | २.८७ | २.९६ |
| भुसावळ संच क्र.४ आणि संच क्र. ५ | ३.३१ | ३.४१ | ३.५१ | ३.६१ | ३.७२ |
| कोराडी संच क्र.८,९,१० | २.४९ | २.५६ | २.६४ | २.७२ | २.८० |
| चंद्रपूर संच क्र. ८ आणि क्र.९ | २.६७ | २.७५ | २.८३ | २.९१ | ३.०० |
| परळी संच क्र.८ | ३.७२ | ३.८३ | ३.९५ | ४.०६ | ४.१९ |

**तक्ता ७: प्रक्षेपित केंद्रनिहाय वार्षिक स्थिर आकार (रुपये कोटी)**

| **तपशील** | **आर्थिक वर्ष २०२०-२१** | **आर्थिक वर्ष २०२१-२२** | **आर्थिक वर्ष २०२२-२३** | **आर्थिक वर्ष २०२३-२४** | **आर्थिक वर्ष २०२४-२५** |
|---|---|---|---|---|---|
| भुसावळ संच क्र.३ | १७१.५६ | १७७.६५ | १८३.४३ | १९७.९० | २०४.६५ |
| चंद्रपूर संच क्र.३ ते ७ | ११६३.१९ | १३५६.२३ | १५३२.७३ | १६८०.११ | १७१६.१९ |
| खापरखेडा संच क्र.१ ते ४ | ६४६.६४ | ६९२.७९ | ८१९.७४ | ७६२.९५ | ७७५.४६ |
| कोराडी संच क्र.६, ७ | ४०१.१४ | ४२०.३८ | ४३८.३५ | ४५६.३४ | ४६४.८६ |
| नाशिक संच क्र.३ ते ५ | ४८३.५४ | ५१७.५० | ५३६.६० | ५६३.३८ | ७५०.०९ |
| उरण | १९५.५३ | २१०.८८ | २२९.२५ | ३०४.५८ | ३३३.८९ |
| पारस संच क्र. ३ आणि संच क्र.४ | ६०२.८४ | ६०८.६५ | ६२५.७७ | ६२५.९२ | ५३४.२६ |
| परळी संच क्र.६ आणि संच क्र. ७ | ५७३.१५ | ५८३.२२ | ५९४.९२ | ५११.९६ | ५१७.७९ |
| खापरखेडा संच क्र.५ | ५९२.१० | ६०१.८४ | ६२२.०० | ६४०.०५ | ६२४.५४ |
| भुसावळ संच क्र.४ आणि संच क्र. ५ | ११८९.८८ | १२००.८९ | १२५८.८३ | १३११.६३ | १२९७.७५ |
| कोराडी संच क्र.८,९,१० | २३९५.३१ | २३९७.७१ | २४८९.५५ | २५७१.८१ | २५२५.३८ |
| चंद्रपूर संच क्र. ८ आणि क्र. ९ | १२६२.२१ | १२८८.३० | १३४७.३४ | १४०१.०७ | १३८७.८९ |
| परळी संच क्र.८ | ४१९.०८ | ४२७.४३ | ४३२.२२ | ४३७.२९ | ४३५.४९ |
| पुणे SHP | ३७२.६९ | ३८१.९० | ३९४.५७ | ३९३.८७ | ३९६.१५ |
| भिरा | १०.३५ | ११.१० | ११.७८ | ११.९९ | १२.२१ |
| कोयना | ४४८.१५ | ४६३.९८ | ४७९.६६ | ४७४.०३ | ४७६.४६ |
| तिल्लारी | १८.१९ | १९.४८ | २०.८५ | २१.८७ | २२.५३ |
| **एकूण** | **१०९४५.५४** | **११३५९.९२** | **१२०१७.५७** | **१२३६६.७६** | **१२४७५.६०** |

**तक्ता ८: वीज निर्मिती केंद्रांसाठी एकंदर महसूल आवश्यकतेचा सारांश:**

| तपशील | आर्थिक वर्ष २०२०-२१ | आर्थिक वर्ष २०२१-२२ | आर्थिक वर्ष २०२२-२३ | आर्थिक वर्ष २०२३-२४ | आर्थिक वर्ष २०२४-२५ |
|---|---|---|---|---|---|
| भुसावळ संच क्र.३ | ७०१.४५ | ७२३.४४ | ७४५.६० | ७७६.९३ | ८०१.०५ |
| चंद्रपूर संच क्र.३ ते ७ | ४६९१.७९ | ४९९०.६८ | ५२७६.२२ | ५५३५.९० | ५६८७.६६ |
| खापरखेडा संच क्र.१ ते ४ | २३१६.२३ | २४१२.४७ | २५९१.०२ | २५८७.३६ | २६५४.६० |
| कोराडी संच क्र.६, ७ | ११२७.२७ | ११६८.२९ | १२०८.७० | १२४९.८१ | १२८२.१३ |
| नाशिक संच क्र.३ ते ५ | १८१५.१८ | १८८९.०९ | १९४९.३३ | २०१८.५० | २२४८.८६ |
| उरण | ९११.३८ | ९४८.२० | ९८८.६९ | १०८६.८१ | ११३९.५८ |
| पारस संच क्र.३ आणि संच ४ | १६२२.२० | १६५८.५९ | १७०७.२० | १७३९.८० | १६८१.५६ |
| परळी संच क्र.६ आणि संच ७ | १८८२.६८ | १९३२.०३ | १९८४.२० | १९४२.९३ | १९९१.६८ |
| खापरखेडा संच क्र.५ | १५१२.२८ | १५४९.६३ | १५९८.२२ | १६४५.५५ | १६६०.२१ |
| भुसावळ संच क्र.४ आणि संच ५ | ३५०४.६१ | ३५८५.०६ | ३७१४.५२ | ३८४१.०० | ३९०३.०० |
| कोराडी संच क्र.८,९,१० | ५८४०.०१ | ५९४५.७६ | ७१४४.०४ | ६३३५.९३ | ६४०२.४२ |
| चंद्रपूर संच क्र. ८ आणि ९ | ३१२८.९८ | ३२११.०८ | ३३२७.८० | ३४४०.९४ | ३४८८.९६ |
| परळी संच क्र. ८ | १०५२.६९ | १०८०.०६ | ११०४.४२ | ११२९.६६ | ११४८.६३ |
| पुणे SHP | ३७२.६९ | ३८१.९० | ३९४.५७ | ३९३.८७ | ३९६.१५ |
| भिरा | १०.३५ | ११.१० | ११.७८ | ११.९९ | १२.२१ |
| कोयना | ४४८.१५ | ४६३.९८ | ४७९.६६ | ४७३.०३ | ४७६.४६ |
| तिल्लारी | १८.१९ | १९.४८ | २०.८५ | २१.८७ | २२.५३ |
| **एकूण** | **३०९५६.१३** | **३१९७०.८३** | **३३.२४६.८१** | **३४.२३२.८७** | **३४९९७.७०** |

**तक्ता ९: चौथ्या नियंत्रण कालावधीसाठी एकूण महसुलाची आवश्यकता. (एकत्रित ) (रुपये कोटी)**

| तपशील | आर्थिक वर्ष २०२०-२१ | आर्थिक वर्ष २०२१-२२ | आर्थिक वर्ष २०२२-२३ | आर्थिक वर्ष २०२३-२४ | आर्थिक वर्ष २०२४-२५ |
|---|---|---|---|---|---|
| **अस्थिर आकार** | | | | | |
| इंधनसंबंधीत खर्च | २००१०.५९ | २०६१०.९१ | २१२२९.२४ | २१८६६.११ | २२५२२.१० |
| एकूण अस्थिर आकार | २००१०.५९ | २०६१०.९१ | २१२२९.२४ | २१८६६.११ | २२५२२.१० |
| **क्षमता आकार** | - | - | - | - | - |
| संचालन व सुव्यवस्था खर्च | २८८६.६६ | ३००२.५१ | ३१२३.०० | ३२४८.५१ | ३३७८.९४ |
| वेतन तरतूद | २५९.२९ | २७०.३६ | २८१.९१ | २९३.९४ | ३०६.४९ |
| इतर खर्च | ३७६.१५ | ३९२.२२ | ४०८.९६ | ४२६.४३ | ४४४.६४ |
| जल आकार | १८५.९५ | १९३.८९ | २०२.१७ | २१०.८० | २१९.८० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दीर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज आणि वित्तीय भार | १८५०.०७ | १७८२.१६ | १७९१.११ | १७७१.९३ | १५५६.९२ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | ७५४.४२ | ७७७.११ | ८०७.२९ | ८३३.७५ | ८५७.२२ |
| घसारा | २२०३.५२ | २४०७.२७ | २६८०.६२ | २७०२.८४ | २८०५.७९ |
| भाग भांडवलावरील परतावा | १९६१.३० | २०७७.७० | २२६५.८२ | २४४३.९४ | २४७९.३८ |
| भाडेपट्टी आकार | ५६७.३२ | ५५५.८४ | ५५५.८४ | ५३३.७६ | ५२५.५५ |
| आयकर | | | | | |
| वजा वीज विक्री सोडून उत्पन्न | ९९.१३ | ९९.१३ | ९९.१३ | ९९.१३ | ९९.१३ |
| **एकूण क्षमता आकार** | **१०९४५.५०** | **११३५९.९२** | **१२०१७.५७** | **१२३३६.७६** | **१२४७५.६०** |
| एकूण महसुलाची आवश्यकता | **३०९५६.१३** | **३१९७०.८३** | **३३२४६.८१** | **३४२३२.८७** | **३४९९७.७०** |

**<u>प्रार्थना</u>**:

माननिय आयोगास सविनय विनंती आहे कि,

१. याचिका स्वीकृत करावी.

२. याचिकेची जलद सुनावणी करावी.

३. आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी पुढील मुद्यांवर आधारित सादरीकरण लक्षात घेऊन एकूण महसुलाची गरज मान्य करून समायोजन करावे.

अ. उरण वायू विद्युत केंद्रासाठी मिळणाऱ्या वायूची कमतरता लक्षात घेऊन लक्षित उपलब्धता शिथिल करावी.

ब. चंद्रपूर औष्णिक वीज केंद्र व पारस औष्णिक वीज केंद्र यांना २०१७-१८ या वर्षासाठी पाण्याची अतीव कमतरता लक्षात घेऊन लक्षित उपलब्धता शिथिल करावी.

क. आ.व.२०१७-१८ व आ.व.२०१८-१९ करिता पारस संच क्र.३ व ४ परळी संच क्र.६ व ७ येथे ट्यूब प्रकारच्या व कोल मिल चा उपयोग केला असल्यामुळे सहाय्यकारी वीजवापराचा मानक ०.८% ने शिथिल करावे. अधिक वीज वापर करण्यास परवानगी द्यावी.

ड. वस्तू व सेवा कर लागु केल्यामुळे हा कायद्यात झालेला बदल मान्य करून महानिर्मितीला संचालन व दुरुस्ती विषयक खर्चावर आकारलेला वस्तू व सेवा कर याची भरपाई मिळावी.

इ. संचलन व दुरुस्ती विषयक खर्च मानकांमध्ये शिथिलता आणून प्रत्यक्षात झालेला खर्च वसुलीस मान्यता द्यावी.

४. आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी पुढील मुद्यांवर आधारित सादरीकरण लक्षात घेऊन एकूण महसुलाची गरज मान्य करून समायोजन करावे.

अ) उरण वायू विद्युत केंद्रासाठी मिळणाऱ्या वायूची कमतरता लक्षात घेऊन लक्षित उपलब्धता शिथिल करावी.

ब) चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्र व पारस औष्णिक विद्युत केंद्र यांना आ.व.२०१८-१९ या वर्षासाठी पाण्याची अतीव कमतरता लक्षात घेऊन लक्षित उपलब्धता शिथिल करावी.

क) वस्तू व सेवा कर लागु केल्यामुळे हा कायद्यात झालेला बदल मान्य करून, जलविद्युत केंद्राच्या भाडेपट्टीवर आकारलेल्या वस्तू व सेवा कर याची भरपाई मिळावी.

ड) वस्तू व सेवा कर लागु केल्यामुळे हा कायद्यात झालेला बदल मान्य करून महानिर्मितीला संचालन व सुव्यस्था विषयक खर्चावर आकारलेला वस्तू व सेवा कर याची भरपाई मिळावी.

इ) संचलन व सुव्यस्था विषयक खर्चाच्या मानका मध्ये शिथिलता आणून प्रत्यक्षात झालेला खर्च वसुलीस मान्यता द्यावी.

५. काही योजनांच्या भांडवली खर्चा बाबत माननिय आयोगाने असा आदेश दिलेला आहे कि, सदर योजना महानिर्मितीने स्वत:च्या भाग भांडवलाच्या परताव्यातून पूर्ण कराव्यात अशा योजनांचे सविस्तर विवेचन हे याचिकेत केलेले आहे. मा. आयोगाच्या भांडवली खर्च तत्वानुसार मान्यता मिळावी.

६. आर्थिक वर्ष २०१९-२० साठी पुढील मुद्यांवर आधारित सादरीकरण लक्षात घेऊन एकूण महसुलाची गरज मान्य करून समायोजन करावे.

अ) उरण वायू विद्युत केंद्रासाठी मिळणाऱ्या वायूची कमतरता लक्षात घेऊन लक्षित उपलब्धता शिथिल करावी.

ब) जलविद्युत केंद्रामध्ये अतिवृष्टीमुळे आकस्मितरित्या पाणी भरणे ही नैसर्गिक आपत्ती समजून होणारा भांडवली खर्च, दुरुस्ती व देखभाल खर्च हे एक वेळेस होणारा खर्च समजून मान्यता द्यावी.

७. याचिकेमध्ये समाविष्ठ केलेल्या पगार वाढीच्या खर्चास मान्यता मिळावी व त्याची वसुली हि प्रत्यक्षात होणाऱ्या देयकानुसार वसूल करण्याची परवानगी मिळावी.

८. औष्णिक विद्युत केंद्राचा उर्जा दर ठरवितांना कोळशामधील असलेल्या पाण्याच्या आद्रतेची दखल साधारण उष्मांक काढतांना कशाप्रकारे घ्यावी याबद्दल यथोचित मार्गदर्शन करण्यात यावे.

९. कोळसा वापराबद्दल वर्ष २०२०-२१ ते वर्ष २०२४-२५ पर्यंतचा आराखडा मान्य करावा व महानिर्मितीला लवचिकतेनुसार कार्यक्षमरीत्या उपलब्ध असलेला कोळसा वापरण्यास मान्यता द्यावी.

१०. कोराडी, चंद्रपूर व परळी संच क्र.८ या नविन प्रकल्पाचे मा.आयोगाने मंजुरी दिलेले पण अद्याप अपूर्ण असलेल्या योजना भांडवली खर्चात समाविष्ट करण्यास ३१.०३.२०२१ पर्यंत परवानगी द्यावी.

११. महानिर्मितीला खालील समायोजित केलेली रक्कम वसूल करण्यास परवानगी मिळावी.

अ) याचिकेत दाखल केलेल्या विवेचना नुसार आ.व. २०१५-१६ व आ.व.२०१६-१७ या वर्षासाठी प्रलंबित समायोजन रक्कम.

ब) आ.व.२०१७-१८ साठी अंतिम समायोजन व आ.व.२०१९-२० करिता तात्पुरते समायोजन तसेच याचिकेत सादर केलेले अतिरिक्त समायोजन.

क) सदर याचिकेद्वारा मागितलेले वाढीव समायोजन रक्कम व आ.व.२०१३-१४ पासून प्रलंबित असलेली प्रतिक्रियाशील ऊर्जेची (Reactive Energy Charges) रक्कम अदा करण्यास संबंधित यंत्रणेला निर्देश द्यावेत.

ड) आ.व.२०२०-२१ या वर्षासाठी समायोजन रक्कमेचे व वहन / धारण किंमत (Carryng / Holding Cost) याची वसुली प्रतिमाह बिलाद्वारे करण्यास परवानगी द्यावी व महावितरण कंपनीस प्रतीपुर्तीसाठीचा आदेश द्यावा.

१२. याचिकेमध्ये सादर केल्या प्रमाणे एकूण वार्षिक महसुलाची आवश्यकता मान्य करून बहुवार्षिक दर मान्य करावे.

१३. या याचिकेतील तृटी क्षमापित कराव्यात आणि नंतरच्या टप्प्यात आवश्यकतेप्रमाणे अतिरीत्क्त माहिती/सामग्री सादर करण्यास महानिर्मिती कंपनीला परवानगी द्यावी.

१४. मा. आयोगाने समायोजन व वीजदर निश्चित करतांना वापरलेले वर्केबल एक्सेल मॉडेल द्यावे हि विनंती.

*******************